लोकमत

# ‘बेटी बचाओ’ची पथनाट्याद्वारे जागृती

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठामध्ये कार्यरत असलेल्या बेटी बचाओ अभियानाअंतर्गत शुक्रवारी शिवाजी विद्यापीठातील विद्यार्थी आणि विद्यार्थिनींनी विविध ठिकाणी पथनाट्याद्वारे जनजागृती केली. शिवाजी विद्यापीठाच्या जनजागृती कार्यक्रम बेटी बचाओ अभियानाच्या समन्वयिका डॉ. प्रतिभा बी. देसाई यांच्या नेतृत्वाखाली वसतिगृहासमोर, बस स्टँड, बिंदू चौक आणि भवानी मंडप या ठिकाणी हा जनजागृती कार्यक्रम पथनाट्याद्वारे घेण्यात आला. यावेळी सागर माने, सौरभ बेंद्रे, सोहमदास, रोहित घोलप, शिरीष विचारे, अर्थव मंगल, प्रकृती दुंगेल, सिध्दगरिया उदगी, विशाल खंडागळे, रोहिदास अभंगे यांनी पथनाट्य सादर केले.

20 FEB 2023

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापिठातर्फे व्यवस्थापन विकास कार्यक्रम

कोल्हापूर, ता.१९ (प्रतिनिधी)

नवीन कामगार संहिता व त्याचा उद्योगावरील परिणाम या मुख्य विषयावरील 'व्यवस्थापन विकास कार्यक्रम' नुकताच उत्साहात झाला. शिवाजी विद्यापीठाच्या यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ रूरल डेव्हलपमेंटच्या वतीने कार्यक्रमाचे आयोजन केले होते. सयाजी हॉटेलमधील मेघ मल्हार येथे आयोजित केलेल्या कार्यक्रमाचे उद्धाटन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते झाले. यावेळी प्र-कुलगुरू प्रा. डॉ. पी. एस. पाटील, फेडरेशन ऑफ इंटरनशनल ट्रेनरस अँड स्पीकरचे अध्यक्ष डॉ. योगेशकुमार उपाध्याय, दीपक फर्टिलाझर अँड. पेट्रोकेमिकल्स कोर्पोरेशन लिमिटेडचे समूह अध्यक्ष नरेशकुमार पिनीसेट्टी, स्कूल ऑफ रूरल डेव्हलपमेंटचे प्रभारी संचालक डॉ. नितीन माळी, ज्येष्ठ विधीज्ञ श्रीनिवास इनामती, वरुण जोशी, राजेंद्र चव्हाण, दीपक जोशी, औद्योगिक सुरक्षा व कल्याण विभागाचे उपसंचालक सुरेश जोशी उपस्थित होते. कुलगुरू डॉ. शिर्के यांनी मार्गदर्शन केले.

वरिष्ठ सल्लागार जमशेद कामा यांनी 'औद्योगिक संबंध संहिता व पुढील वाटचाल' या विषयावर मार्गदर्शन केले. वरिष्ठ विधिज्ञ श्रीनिवास इनामती यांनी 'नवीन वेतन संहिता व उद्योगावरील परिणाम' या विषयावर मार्गदर्शन केले. विधिज्ञ वरुण जोशी यांनी 'नवीन कामगार संहितामधील करार कामगार व उद्योग' या अनुषंगाने मांडणी केली. यावेळी डॉ. योगेशकुमार उपाध्याय नरेशकुमार पिनीसेट्टी यांनी विविध मुद्दे मांडले. सुरेश जोशी, विशाल घोडके, विधीज्ञ . राजेंद्र चव्हाण, दीपक जोशी यांनीही सहभागींना मार्गदर्शन केले.

पुढारी

# नाईट कॉलेजमध्ये मराठी विभागातर्फे मोडी लिपी प्रमाणपत्र अभ्यासक्रम

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

नाईट कॉलेजच्या मराठी विभागाच्या वतीने मोडी लिपी प्रमाणपत्र कोर्सचे आयोजन करण्यात आले आहे. या कोर्सअंतर्गत मोडी लिपीचे वाचन व लेखन याचे संपूर्ण प्रशिक्षण विद्यार्थ्यांना दिले जाणार आहे. नाईट कॉलेजमध्ये सकाळी ६ ते ८ या वेळेत होणार असून यासाठी १० उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. एक महिन्याच्या या डिप्लोमा कोर्सला शिवाजी विद्यापीठाच्या आजीवन अध्ययन व विस्तार विभागाची मान्यता आहे.

21 FEB 2023

तरूण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# अ. भा. विद्यापीठ क्रॉसकंट्रीत शिवाजी विद्यापीठाला २ सुवर्णपदक

## २ रौप्यपदकांवरही धावपटूंनी कोरले नाव : बेंगळूर येथे झालेल्या स्पर्धेत देशभरातील १२० विद्यापीठांचा सहभाग







कोल्हापूर : अखिल भारतीय आंतरविद्यापीठ क्रॉसकंट्री स्पर्धेत २ सुवर्ण व २ रौप्य मिळवलेल्या शिवाजी विद्यापीठ मुला-मुलीं संघासोबत प्रशिक्षक प्रा. रामचंद्र पाटील, संघ व्यवस्थापक डॉ. इब्राहीम मुल्ला.

प्रतिनिधी
कोल्हापूर

बेंगळूर (कर्नाटक) येथे झालेल्या अखिल भारतीय आंतरविद्यापीठ क्रॉसकंट्री स्पर्धेत शिवाजी विद्यापीठाच्या संघातील धावपटूंनी शानदार कामगिरी करत २ सुवर्ण व २ रौप्य पदकांची कमाई केली. यातील २ सुवर्ण पदके तर तब्बल १४ वर्षांनी शिवाजी विद्यापीठ संघाला मिळाली आहेत. बेंगळूरमधील प्रेसिडेन्सी युनिर्व्हसिटीमध्ये या स्पर्धेचे आयोजन केले होते. यामध्ये देशभरातील १२० विद्यापीठांनी सहभाग घेतला होता.

स्पर्धेच्या मुलींच्या गटामध्ये झालेल्या १० किलो धावणे प्रकारात शिवाजी विद्यापीठ संघातील रेश्मा केवटेने (डी. पी. भोसले कॉलेज, कोरेगाव) अन्य विद्यापीठांच्या धावपटूंना मागे टाकत सुवर्ण पदक पटकावले. तसेच मुलांच्या गटातही विद्यापीठ संघातील विवेक मोरेने (शिवराज महाविद्यालय, गडहिंग्लज) १० किलो मीटर धावणेत प्रकारात रौप्य पदक मिळवले. याचबरोबर सांघिक मुलांच्या गटातील १० मीटर धावणे प्रकारात विद्यापीठ संघाने वेगवान धाव करत सुवर्ण पदकावर आपले नाव कोरले.

हे पदक मिळवण्यासाठी विद्यापीठ संघातील विवेक मोरे, उत्तम पाटील (नाईट कॉलेज, कोल्हापूर), ओंकार पन्हाळकर (शिवराज महाविद्यालय), बबन शिंदे (आर्ट, कॉमर्स अँड सायन्स कॉलेज, कोवाड, चंदगड), सिद्धांत पुजारी (आजरा महाविद्यालय, आजरा) व प्रतिक उंबरकर (केव्हीएम कॉलेज, वाई, जि. सातारा) यांनी प्रतिस्पर्धी विद्यापीठांच्या धावपटूंना मागे टाकले. मुलींच्या १० किलो मीटर धावणे प्रकारातही शिवाजी विद्यापीठाच्या संघाने रौप्य पदक मिळवले. या पदकाला गवसणी घालण्यासाठी संघातील रेश्मा केवटे, राणी मुचंडी (डी. पी. भोसले कॉलेज, कोरेगाव), आकांक्षा शेलार (केव्हीएम कॉलेज, वाई, जि. सातारा), प्राजक्ता शिंदे (आर्ट, कॉमर्स अँड सायन्स कॉलेज, कोवाड, चंदगड), सृष्टी रेडेकर (शिवराज महाविद्यालय), प्राची देवकर (वेणुताई चव्हाण कॉलेज, कराड) या धावपटूंनी अफलातून धाव केली.